करोना २०२०/सुचना/आदेश क्रमांक - 237

महाराष्ट्रशासन
महसूलववनविभाग
जिल्हाधिकारीवजिल्हादंडाधिकारीकार्यालय,रायगड-अलिबाग
हिराकोटतळयाजवळ,अलिबाग,ता.अलिबाग,जि.रायगड४०२२०१
❖दुरध्वनीक्र:०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२❖फॅक्सक्र:०२१४१-२२७४५१❖
❖ई-मेल:tahasildarmahasul@gmail.com❖

क्रमांक : साशा कार्या/ब-५/करोना-२०२० दिनांक :- १७/०४/२०२०.

वाचले:-

१. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिससूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०
२. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील पत्र क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०
३. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, कलम ३४
४. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४३, ५६
५. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७
६. महाराष्ट्र कोव्हीड-१९ उपाययोजना नियम, २०२०
७. या कार्यालयाकडील आदेश क्र.साशा कार्या/ब-५/करोना-२०२०, दिनांक १२/४/२०२०
८. या कार्यालयाकडील सुधारित आदेश क्र.साशा कार्या/ब-५/करोना-२०२०, दिनांक १४/४/२०२०
९. या कार्यालयाकडील मंजूर टिपणी दिनांक १७/४/२०२०.

---

**सुधारित आदेश,**

रायगड जिल्हयातील उरण तालुक्यात १. श्री.परेश प्रभाकर भोईर, वय ३७ वर्षे, रा. कोटनाका, उरण २. श्रीम.वर्षा यादव, वय-३१, रा.ए-९३०६, सेक्टर, जेएनपीटी टाऊनशिप हया दोन्ही व्यक्ती करानो विषाणु बाधीत आढळून आल्याने तेथे कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी, खालील क्षेत्र Containment Zone ( करोना विषाणू बाधीत क्षेत्र ) व प्रतिबंधक क्षेत्र म्हणून या कार्यालयाकडील आदेश क्र. साशा कार्या/ब-५/करोना-२०२०, दिनांक १२/४/२०२० व १४/४/२०२० अन्वये जाहीर करणेत आलेले आहे.

१. आनंदी निवास-आनंदी हॉटेल-राघोबा देव मंदिर-मच्छिमार्केट – उमेश गायकवाड, घर-सतिश फोटो स्टूडीओ-शिवप्रेरणा इमारत राखे बिल्डींग-काळाधोंडा-भोईर बंगला, केळकर बिल्डींग,
२. जेएनपीटी टाऊनशिप सेक्टर – २ A९० ते ९५

**सबब मा.भारत सरकार यांच्याकडून प्राप्त झालेल्या सूचनांनुसार मी निधी चौधरी, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड, या आदेशाव्दारे वरील जाहिर करणेत आलेले Containment Zone ( करोना विषाणू बाधीत क्षेत्र ) व प्रतिबंधक क्षेत्र हे उरण तालुक्यातील वरील क्षेत्रासाठी दिनांक १२/४/२०२० च्या आदेशापासून २८ दिवसांपर्यंत (दिनांक ९/५/२०२० पर्यंत) मर्यादित राहील.**

तरी अशाप्रकारचा प्रतिबंध लागू असल्याबाबत रायगड जिल्हयातील पनवेल/उरण तालुक्यातील वरील भागामध्ये व कोरोना विषाणु बाधीत क्षेत्र म्हणुन घोषीत केलेल्या आजुबाजूच्या परिसरात येणारी सर्व महानगरपालिका /नगरपरिषद प्रभाग/गावे यामधील सर्व शासकीय कार्यालये, सार्वजनिक ठिकाणे येथे लेखी नोटीस लावून तसेच दवंडी देवुन महानगरपालिका, मुख्याधिकारी, तलाठी , ग्रामसेवक व पोलीस पाटील यांनी प्रसिध्दी दयावी.

सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुध्द आपती व्यवस्थापन अधिनियम , २००५ कलम ५१ अन्वये तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ७१ , १३९ तसेच भारतीय दंड संहिता ( ४५ ऑफ १८६०) च्या कलम १८८ अन्वये कारवाई करण्यात येईल.

(निधी चौधरी)
जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष
आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड

प्रत :- मा.पोलीस आयुक्त नवी मुंबई यांना पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.
प्रत :- जिल्हा पोलीस अधिक्षक, रायगड-अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- मुख्य कार्यकारी अधिकारी, रा.जि.प.अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- आयुक्त, महानगरपालिका पनवेल यांना पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत :- जिल्हा शल्य चिकीत्सक, रायगड-अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- उप विभागीय अधिकारी पनवेल यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- तहसिलदार उरण यांना पुढील कार्यवाहीसाठी ,
प्रत :- मुख्याधिकारी उरण यांना पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत :- वरीष्ठ पोलीस निरीक्षक, उरण यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी, उरण यांना पुढील कार्यवाहीसाठी

Scanned with CamScanner